आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२८ जून २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशातल्या पहिल्या कॉन्स्टीट्युशन प्रीॲम्बल पार्कचं सरन्यायाधीशांच्या हस्ते लोकार्पण

- महास्ट्राइड प्रकल्पांतर्गत सर्व जिल्हाधिकाऱ्यांची बैठक आज सुरू होणार

- भाजपा प्रदेशाध्यक्षपदाच्या आणि राष्ट्रीय परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

- मन की बात मधून उद्या प्रधानमंत्र्यांचा देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद

आणि

- जागतिक एथलेटिक्सच्या क्रमवारीत भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्राला पुन्हा एकदा अव्वल स्थान

**<><><><><>**

देशातल्या पहिल्या कॉन्स्टीट्युशन प्रीॲम्बल पार्कचं म्हणजेच संविधान प्रास्ताविका केंद्राचं - लोकार्पण आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते नागपूर इथं झालं. भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरणही गवई यांच्या हस्ते झालं. नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाच्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉ इथं हे पार्क उभारण्यात आलेलं आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन सांबरे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.

या पार्कच्या मध्यभागी डॉक्टर आंबेडकर यांची संविधान हातात धरलेली प्रतिमा आहे. भारतीय संविधान, आम्ही लोक, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, प्रजासत्ताक, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता आदी दहा मूल्यांची भित्तिचित्रं या ठिकाणी लावली आहेत. लोकशाहीचे मुख्य आधारस्तंभ असलेल्या राष्ट्रपती भवन, संसद भवन, सर्वोच्च न्यायालय यांच्या प्रतिकृती आणि अशोक स्तंभ देखील तयार करण्यात आला आहे. दोन एकर परिसरावर वसलेल्या या पार्कला भव्य प्रवेशद्वार उभारण्यात आलं आहे.

**<><><><><>**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी महास्ट्राइड या महाराष्ट्राला आर्थिकदृष्ट्या अग्रेसर बनवणाऱ्या प्रकल्पांतर्गत सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय परिषदेचं उद्घाटन आज नागपूर इथं होणार आहे. भारतीय व्यवस्थापन संस्था-आय.आय.एम. इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज सायंकाळी पाच वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र करण्याच्या केंद्र सरकारच्या संकल्पात राज्याची अर्थव्यवस्था साडेतीन ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचं ध्येय निश्चित केलं आहे. यासाठी राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्याच्या विकासावर चर्चेसाठी ही परिषद होत आहे. यापार्श्वभूमीवर बावीसशे कोटींहून अधिक रकमेच्या महास्ट्राईड प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीवर यावेळी विचारमंथन होणार आहे.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात राज्य सरकारनं पाणी संवर्धनासंदर्भात एका स्वयंसेवी संस्थेशी तीन वर्षांचा सामंजस्य करार केला आहे. याअंतर्गत तीन हजार एकर क्षेत्रावर शेतीविकास, जलसंधारण, पायाभूत सुविधा आणि उत्पादनक्षमता वाढीसाठी विविध उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. या प्रकल्पाचा एटापल्ली तालुक्यातल्या ३० गावांमधील सुमारे तीन हजार शेतकऱ्यांना थेट लाभ होणार

आहे. या भागात पाण्याच्या टिकवणुकीसाठी स्वयंसेवी संस्थांनी हाती घेतलेले कार्य उल्लेखनीय असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**<><><><><>**

राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटी सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावर राज्यातील सर्वात मोठे भंगार केंद्र उभारणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी महामंडळाच्या आढावा बैठकीत ही माहिती दिली. या केंद्रात जुन्या वाहनांची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येणार असून त्याद्वारे काही सुटे भाग पुन्हा वापरता येतील असंही ते म्हणाले. छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील खुलताबाद येथे असलेल्या एसटी महामंडळाच्या १०० एकर जागेवर हे केंद्र उभारलं जाणार आहे.

**<><><><><>**

भाजपा प्रदेश अध्यक्षपदाच्या आणि राष्ट्रीय कार्यकारिणीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार येत्या सोमवारी २९ जून रोजी पक्षाच्या राज्य कार्यकारिणी सदस्यांची नावं जाहीर होतील. ३० जून रोजी भाजपा प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. दुपारी ३ ते ५ या वेळात हे अर्ज दाखल करता येतील. १ जुलै रोजी सकाळी १० वाजता प्रदेश अध्यक्षांच्या आणि राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्यांच्या निवडीची घोषणा करण्यात येईल, अशी माहिती प्रदेश निवडणूक अधिकारी आमदार चैनसुख संचेती यांनी दिली आहे.

**<><><><><>**

मुंबईच्या टाटा मेमोरियल सेंटरमध्ये १७ वर्षीय रुग्णावर री-लॅप्स्ड न्यूरोब्लास्टोमा अर्थात उपचारानंतर पुन्हा उद्भवणाऱ्या मज्जासंस्थेच्या कर्करोगासाठीची देशातली पहिली उच्च शक्ती 131I-mIBG थेरपी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. या

रुग्णाची प्रकृती सध्या चांगली असल्याची माहिती सेंटरनं जारी केलेल्या निवेदनात दिली आहे. री-लॅप्स्ड न्यूरोब्ला स्टोमा हा आजार प्रामुख्यानं लहान मुलांना होतो.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधतील. हा या कार्यक्रमाचा १२३ वा भाग असेल.  आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व प्रसारण सेवा, युट्यूब वाहिन्या, संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एअर या मोबाईल ॲपवरून या कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल.

**<><><><>**

तरुणांना भारतीय परंपरांशी जोडण्यात महान जैन ऋषींचे मोलाचं योगदान आहे, असं मत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्ली इथं आचार्य विद्यानंद जी महाराजांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमाचं उद्घाटन केल्यानंतर व्यक्त केलं. या प्रसंगी त्यांनी जैन मुनींच्या हस्त लिखीतांचं डीजीटायजेशन करण्याबद्दल माहिती दिली. यावेळी विशेष स्मारक नाणं आणि टपाल तिकिटाचंही प्रकाशन करण्यात आले. यावेळी विशेष मनोरंजनाच्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><><>**

सहकार क्षेत्राच्या मजबुतीसाठी शासकीय स्तरावर चाललेल्या प्रयत्नांचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांनी या महिनाअखेरीस सर्व राज्यांच्या आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सहकार मंत्र्यांची बैठक बोलावली आहे. या मंथन बैठकीत दोन लाख बहुउद्देशीय प्राथमिक  कृषी पतपेढ्या, तसंच मच्छिमार आणि दुग्धव्यावसायिकांच्या पतपेढ्यांची स्थापना त्याचप्रमाणे जगातल्या सर्वात मोठ्या गोदाम सुविधेची योजना या विषयावर चर्चा होईल.

**<><><><>**

मुंबई विद्यापीठाच्या हिवाळी सत्राच्या परीक्षांच्या तारखा विद्यापीठानं आज जाहीर केल्या. वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखेअंतर्गत येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा ७ ऑक्टोबरपासून होणार आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखेच्या परीक्षा १४ ऑक्टोबरपासून सुरू होतील. मानव्य विज्ञान शाखेअंतर्गत येणाऱ्या विविध विषयांच्या परीक्षा १४ ऑक्टोबरपासून, तर विधी शाखेच्या परीक्षा ३ डिसेंबरपासून होणार आहेत. याशिवाय पदव्युत्तर स्तरावरच्या विविध परीक्षांच्या तारखाही विद्यापीठानं जाहीर केल्या आहेत.

**<><><><><>**

जागतिक एथलेटिक्सच्या क्रमवारीत भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्राने पुन्हा एकदा अव्वल स्थान मिळवलं आहे. त्याने ग्रेनेडाच्या एंडरसन पिटर्स ला मागे टाकत दुसऱ्यांदा प्रथम स्थान पटकावलं आहे. गेल्या वर्षी १७ सप्टेंबर ला डायमंड लीग अतिम सामना जिंकल्यानंतर पिटर्स पहिल्या स्थानावर आला होता. निरजच्या सातत्यपूर्ण यशानंतर तो पुन्हा पहिल्या स्थानी आला आहे. पीटर्स दुसऱ्या तर जर्मनीचा जूलियन वेबर तिसऱ्या तर पाकिस्तानचा यंदाचा ऑलिंपिक सुवर्ण पदक विजेता अर्शद नदीम चौथ्या स्थानावर आहे.

**<><><><><>**

परभणी जिल्ह्यात चांगला पाऊस झाला असून खरिपाच्या पेरण्या सुरू झाल्या आहेत. नगदी पिकं असलेल्या कापूस आणि हळद यांची लागवडही पूर्ण करण्यात आली आहे. खरीपाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात मागील पंधरवडयात विकसित कृषी संकल्प अभियान राबविण्यात आलं होतं. या दरम्यान एकूण ९० गावांमध्ये कृषी विज्ञान केंद्राच्या आणि कृषी विद्यापीठाच्या कृषी शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन खरीप पेरणी मार्गदर्शन केलं. यावेळी सुधारित बियाण्यांची निवड, उगवण क्षमता चाचणी, बीज प्रकिया,पेरणीच्या पद्धती तसेच खत व्यवस्थापन यासह नवीन तंत्रज्ञानाचं मार्गदर्शनही करण्यात आलं.

**<><><><><>**

पुढच्या २४ तासात पुणे आणि सातारा जिल्ह्यातल्या घाटमाथा परिसरासाठी हवामानविभागाने पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे.

उद्या २९ जून, सकाळी साडेअकरा पर्यंत कोकण किनारपट्टीवर साडेतीन ते चार मीटर उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता असून लहान होड्यांनी समुद्रात जाऊ नये, असा इशारा भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती केंद्राने दिला आहे.

**//<><><><><>//**